# २०. माझी जबाबदारी आणि संवेदनशीलता




१ दीपिकाचा वाढदिवस होता. तिने तिच्या मित्रमैत्रिणींना घरी बोलावले होते. मैत्रिणी आल्यावर तिने मोठ्या आवाजात गाणी लावली. सगळ्याजणी हसतखेळत मजा करत होत्या.

२ तेवढ्यात शेजारच्या घरातील आजोबा आले. आजोबांनी दीपिकाला गाण्याचा आवाज हळू करायला सांगितला. शेजारच्या आजोबांना उच्च रक्तदाबाचा आजार होता.





३ दीपिकाच्या घरातील मोठ्या आवाजामुळे धडधड वाढून आजोबांना त्रास होऊ लागला होता. आजोबांना त्रास होऊ नये म्हणून दीपिकाने ताबडतोब गाण्याचा आवाज कमी केला.





### .... आणि चूक लक्षात आली !

राहुलची आजी रोज तो शाळेतून येण्याची वाट बघत असायची. शाळेतून घरी आल्यावर ती त्याला खाऊ द्यायची. शाळेत काय काय झाले याची चौकशी करायची. राहुलला आजीशी बोलायचा कंटाळा यायचा. त्याला कधी एकदा खाऊ संपवून टीव्ही वरचा कार्टूनचा कार्यक्रम बघतो असे झालेले असायचे. राहुल आपल्याशी नीट बोलत नाही याचे आजीला खूप वाईट वाटायचे. आजीला उदास बघून आईबाबांना खूप वाईट वाटायचे. एकदा बाबांनी राहुलला त्याच्या वागण्यातील चूक समजावून सांगितली. तेव्हापासून राहुलने आजीशी बोलण्यास टाळाटाळ करणे थांबवले. तो आजीशी प्रेमाने गप्पा मारू लागला.



## सांगा पाहू

या दोन्ही घटनांबद्‌दल वर्गात चर्चा करा.

- दीपिका आणि राहुल यांचे काय चुकले असे तुम्हांला वाटते ?
- त्यांनी त्यांची चूक कशी सुधारली ?
- तुमच्या घरी किंवा शेजारी राहणाऱ्या वृद्‌ध व्यक्ती आहेत का ?
- त्यांना कोणकोणत्या प्रकारची मदत कराल ?

आपल्या सर्वांच्याच घरात किंवा नात्यात वृद्‌ध व्यक्ती असतात. त्या आपल्यावर प्रेम करतात. आपले लाड करतात. मात्र ते आपल्यासारखी धावपळ करू शकत नाहीत. दुकानातून औषध किंवा सामान आणून देणे, माळ्यावरील वस्तू खाली काढून देणे, सुईत दोरा ओवून देणे अशी त्यांची छोटी-छोटी कामे असतात. ती आपण वेळीच करून दिल्याने त्यांना मदत होते. मोठ्या आवाजात टीव्ही किंवा गाणी लावल्याने त्यांना कधीकधी अस्वस्थ वाटू लागते. खूप गोंगाट झाल्यास त्यांना त्रास होतो. अशा वेळी आपण आवाज कमी केला पाहिजे.

अनेकदा आजी-आजोबा दिवसभर घरी असतात. आपल्या मुला-नातवंडांशी गप्पा मारणे हाच त्यांचा विरंगुळा असतो. आपली नात किंवा नातू शाळेत जाऊन काय करतात याविषयी त्यांना कुतूहल असते. आपल्याबद्‌दल त्यांना कौतुक वाटत असते. अशा वेळी आपण त्यांच्याशी प्रेमाने बोलल्यास त्यांना आनंद मिळतो.



## सांगा पाहू

**घरात किंवा शेजारी आजारी माणसे असतील तर तुम्ही काय कराल ?**

तुम्हांला जे योग्य वाटते त्याच्यासमोर ✓ खूण करा. जे योग्य वाटत नाही त्याच्यासमोर × खूण करा.

| | |
|---|---|
| आजारी माणसाला उठसूट आणि कोणत्याही वेळी भेटायला जावे. | |
| आजारी माणसाला वेळेवर औषधे द्यावीत. | |
| आजारी माणसाला तळलेले पदार्थ खायला द्यावे. | |
| आजारी माणसाला अनावश्यक सल्ले देऊ नयेत. | |
| आजारी माणसाला वेळच्या वेळी जेवण द्यावे. | |
| आजारी माणसाच्या खोलीत मोठ्या आवाजात टीव्ही पाहावा. | |
| आजारी माणसाला डॉक्टरांच्या सल्ल्यानेच अंघोळ घालावी. | |
| बरे वाटू लागले, की डॉक्टरांना न विचारता औषध घेणे लगेच बंद करून टाकावे. | |

आजारी माणूस लवकर बरा व्हावा, असे आपल्या सर्वांनाच वाटत असते. त्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याची योग्य ती काळजी घ्यावी. छोट्यामोठ्या दुखापतींवर प्रथमोपचार करून आजारी माणसाला दवाखान्यात किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन जावे. गंडेदोरे, ताईत, अंगारे-धुपारे किंवा तांत्रिक-मांत्रिक यांचा अवलंब करू नये. डॉक्टरांकडून वेळीच उपचार करून घ्यावेत.

## विशेष गरजा असलेल्या व्यक्तींविषयीची माझी जबाबदारी


जन्मतः आजारपण किंवा अपघातामुळे आपल्यापैकी काही व्यक्तींना शारीरिक अपंगत्व येते. सार्वजनिक ठिकाणी वावरताना त्यांना अनेक अडचणी आणि गैरसोईंवर मात करावी लागते. त्यामुळे त्यांना विशेष सेवा-सुविधा आणि मदतीची गरज असते.

### माहीत आहे का तुम्हांला

आपल्या देशातील पोलिओ हा आजार हद्दपार करण्यात आपल्याला यश मिळालेले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने आपल्या देशाची यासाठी प्रशंसा केली आहे. पोलिओ निर्मूलनाची मोहीम गेली अनेक वर्षे सातत्याने राबवल्याने आपल्या देशाला पोलिओवर मात करता आली.

- 'दो बूँद जिंदगी के' हे वाक्य कशाच्या संदर्भात आहे याची माहिती घ्या.

### माहीत आहे का तुम्हांला



आजारी माणसाची सेवा करताना रोबो

परदेशातील काही इस्पितळांत आता आजारी माणसाच्या सेवा-शुश्रूषेसाठी रोबोंचा वापर केला जातो. रोबोंकडून काम करून घेताना मजा येईल का ? की माणूस अवतीभवती नसेल तर कंटाळा येईल ?

### करून पहा

वर्गातील सगळ्या मुलामुलींची दोन गटांत विभागणी करा. 'अ' गटातील मुलामुलींच्या डोळ्यावर पट्टी बांधा. 'ब' गटातील मुलामुलींच्या डोळ्यांवर पट्टी बांधू नका. दोन्ही गटांतील एक-एक मुलामुलीला एकत्र करून जोड्या करा. प्रत्येक जोडी वर्गापासून शाळेच्या मुख्य दरवाजापर्यंत जाईल. तिथे पोहचल्यावर 'अ' गटातील मुलीच्या/मुलाच्या डोळ्यांवरील पट्टी सोडा आणि 'ब' गटांतील मुलीच्या/मुलाच्या डोळ्यांवर बांधा. आता दोघेही परत वर्गात या.


- डोळ्यांवर पट्टी बांधून चालताना कोणत्या अडचणी आल्या ?
- डोळ्यांवर पट्टी असताना तुम्ही नेहमीच्या वेगाने चालू शकलात का ?
- तुमच्या डोळ्यांवर पट्टी नसताना तुम्ही तुमच्या जोडीतील मुला-मुलीसाठी थांबत होता, की त्याला/तिला मागे टाकून पुढे जात होता ?

• तुमचा/तुमची जोडीदार तुम्हांला मागे टाकून गेला असल्यास तुम्हांला कसे वाटले ?



रस्त्यावरून जाताना हातात पांढरी काठी घेऊन चाललेली एखादी दृष्टिहीन व्यक्ती तुम्ही पाहिली असेल. पांढऱ्या काठीच्या मदतीने दृष्टिहीन व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी मोकळेपणाने वावरू शकतात. काही इमारतींमधील उद्‌वाहकांपाशी (लिफ्टपाशी) मजल्यांचे क्रमांक ब्रेल लिपीमध्ये लिहिलेले असतात. त्यामुळे कोणाच्याही मदतीशिवाय अशा इमारतींमध्ये त्या व्यक्ती हव्या त्या मजल्यावर जाऊ शकतात. मतदान यंत्रावर ब्रेल लिपीच्या सोईमुळे दृष्टिहीन व्यक्तीही इतरांप्रमाणे गुप्त मतदान करू शकतात.


शाळा-महाविद्यालयांमध्ये तसेच काही इमारतींमध्ये तुम्ही पायऱ्यांशेजारी उताराचा पट्टा बांधलेला पाहिला असेल. या उताराच्या पट्ट्याला 'रॅंप' असे म्हणतात. रॅंपमुळे चाकाची खुर्ची वापरणाऱ्या व्यक्तींना इमारतींच्या आत येणे शक्य होते. चाकाची खुर्ची वापरणाऱ्यांसाठी विशेष प्रकारच्या शौचालयांची सुविधाही काही इमारतींमध्ये असते.



'रॅंप'


विशेष गरजा असलेल्या व्यक्तींना आपले दैनंदिन व्यवहार सुरळीत पार पाडता यावेत यासाठी या सुविधा असतात. मात्र या सुविधा सर्व ठिकाणी उपलब्ध असतातच असे नाही. सार्वजनिक ठिकाणी सुविधा असोत किंवा नसोत, विशेष गरजा असलेल्या व्यक्तींशी आपण प्रेमाने वागले पाहिजे.

दृष्टिहीन व्यक्ती स्पर्शाच्या लिपीचा वापर करून लिहू-वाचू शकतात. या लिपीला ब्रेल लिपी असे म्हणतात. या लिपीत प्रत्येक अक्षरासाठी काही टिंब ठरलेली आहेत. कागदावर दाब देऊन ठरावीक टिंबांना उठाव दिला जातो. कागदावरील या उठावदार टिंबांना स्पर्श करून दृष्टिहीन व्यक्ती लिहिलेला मजकूर वाचू शकतात. आपल्या भाषेत मिळणारी सगळीच पुस्तके काही ब्रेलमध्ये मिळत नाहीत. आपण आपल्याला आवडलेली गोष्ट आपल्या दृष्टिहीन मित्राला किंवा मैत्रिणीला वाचून दाखवू शकतो.

**करून पहा**

- चित्रात दिलेली ब्रेल लिपीतील चिन्हे वापरून तुमचे नाव लिहा.
- खुणांच्या भाषेतील चिन्हे वापरून तुमच्या मित्र/मैत्रिणीचे नाव सांगा.




ब्रेल लिपी




**खुणांची भाषा**

कर्णबधिर व्यक्तींसाठी खुणांची भाषा असते. शिवाय बोलणाऱ्याच्या ओठांच्या हालचाली व हावभाव पाहून बोललेले समजून घेण्याचे तंत्रही त्यांना शिकवले जाते. आपण जर सावकाश आणि स्पष्टपणे त्यांच्याशी बोललो तर त्यांना आपले बोलणे समजते, म्हणून आपण त्यांच्याशी सावकाश आणि स्पष्टपणे बोलत संवाद साधू शकतो. कर्णबधिरांसाठी सांकेतिक खुणांच्या विशेष बातम्या दूरदर्शनवर असतात.

## माहीत आहे का तुम्हांला

- सुधा चंद्रन या भरतनाट्यम नृत्यात पारंगत असलेल्या नर्तिका आहेत. एका अपघातात त्यांना एक पाय गमवावा लागला. तरीही कृत्रिम पाय लावून त्यांनी अत्यंत जिद्दीने नृत्य आणि अभिनय चालू ठेवला आहे.
- रवींद्र जैन दृष्टिहीन आहेत. त्यांनी अनेक चित्रपटांना आणि दूरदर्शन मालिकांना संगीत दिले आहे. त्यांच्या मधुर संगीताबद्दल त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.
- शरद गायकवाड यांचा एक हात अधू आहे. मात्र पोहण्याच्या शर्यतीमध्ये त्यांनी आपल्या देशाचे नाव जगभरात पोहचवले आहे.

## आपण काय शिकलो

- आपल्या कुटुंबातील आणि परिसरातील व्यक्तींच्या अडीअडचणी समजावून घेणे, वेळप्रसंगी त्यांना मदत करणे म्हणजे संवेदनशील असणे होय.
- आपल्या आजूबाजूला किंवा कुटुंबात असणाऱ्या वृद्ध, आजारी व विशेष गरजा असलेल्या व्यक्तींशी आपण प्रेमाने व आदराने वागले पाहिजे.
- संवेदनशीलतेमुळे आपल्यातील मदत करण्याची वृत्ती वाढते.

## स्वाध्याय

5EYG9H

### (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. आजी-आजोबांना कोणता विरंगुळा असतो ?

२. आजारी माणसाची कोणाच्या सल्ल्यानुसार काळजी घ्यावी ?

### (आ) योग्य, अयोग्य लिहा.

१. मोठ्या आवाजात टीव्ही किंवा गाणी लावावीत. [ ]

२. आजार बरा व्हावा म्हणून गंडेदोरे, ताईत, अंगारे-धुपारे किंवा तांत्रिक-मांत्रिक यांचा अवलंब करावा. [ ]

### (इ) चुकीचा शब्द खोडा.

१. कर्णबधिर ब्रेल लिपी/खुणांची भाषा वापरतात.

२. पांढऱ्या काठीमुळे/चाकाच्या खुर्चीमुळे दृष्टिहीन व्यक्तींना रस्ता ओलांडणे शक्य होते.

### उपक्रम

- अंधशाळेला भेट द्या. ब्रेल लिपीची माहिती मिळवा.
- विशेष गरजा असलेल्या व्यक्तींसाठी असणाऱ्या शासकीय योजना शिक्षकांच्या मदतीने समजावून घ्या.
- विशेष गरजा असलेल्या व्यक्तींसाठी काम करणाऱ्या एखाद्या संस्थेची माहिती मिळवा.

* * *